क्रमांक : ९३१६/ड-३ (समिती समन्वय)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : १८ जून, २०२१.

# : : परिपत्रक : :

संदर्भ : **१) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.३६१२/ड-३ दिनांक २ मार्च, २०२१.**
**२) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.५४५३/ड-३ दिनांक २४ मार्च, २०२१.**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व समिती कक्षांना मा.पीठासीन अधिकारी यांच्या निदेशानुसार कळविण्यात येते की, राज्यातील कोविड-१९ महामारीच्या रुग्ण संख्येत घट होत असल्याने टप्प्या-टप्प्याने निर्बंध शिथिल करण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर विधानमंडळ समित्यांनी **अंतर्गत कामकाजासंदर्भातील तसेच आगामी अधिवेशनात ठेवावयाच्या प्रारुप अहवालास मान्यता देण्यासंदर्भातील समितीच्या बैठका NIC च्या दूरदृश्य प्रणालीद्वारे (V.C.) आयोजित करण्यास** मा. पीठासीन अधिकारी यांच्या मान्यतेने अनुमती देण्यात येत आहे. तथापि, विधानमंडळ समित्यांनी **विभागीय सचिवांची साक्षीची बैठक आयोजित करु नये.**

**( राजेंद्र भागवत )**
सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**याची प्रत :**

१) सर्व समित्यांचे मा.समिती प्रमुख व मा.सदस्य.
२) या सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.

**प्रतिलिपी :**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.
२) मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
३) मा.विरोधी पक्ष नेते (विधानपरिषद/विधानसभा) यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.